# 'चांगला' डॉक्टर शोधण्यासाठी वाटाड्या

डॉ. अनंत फडके
anant.phadke@gmail.com

**रुग्णोपयोगी संकेतस्थळ**

"चांगला, तज्ञ डॉक्टर कसा गाठायचा?" असा प्रश्न आपल्याला केव्हा ना केव्हा पडतो. आता फॅमिली-डॉक्टर ही पद्धत विलयाला गेली असल्याने हा प्रश्न आपण आप्तेष्टांना विचारतो व आप्तेष्ट आपापल्या समजेनुसार उत्तर देतात. या प्रश्नाचे सरस मार्गाने उत्तर मिळण्यासाठी एक अभिनव उपक्रम 'पुणे सिटीझन डॉक्टर फोरम' या गटाने पुण्यात सुरु केला आहे. तो समजावून घेतांना चांगला डॉक्टर म्हणजे कोण हे आधी स्पष्ट करून घेऊया. ज्याचे निदान व उपचार चांगले असतात, जो रुग्णांशी संवेदनशीलतेने वागतो व जो औषध-कंपन्या वा इतर व्यावसायिक हितसंबंधाना नव्हे तर रुग्ण-हिताला प्राधान्य देतो तो चांगला डॉक्टर असे म्हणता येईल. या निकषांनुसार एखादा डॉक्टर चांगला आहे की नाही हे रुग्ण ठरवू शकत नसले तरी एखादा डॉक्टर रुग्ण-संवादी व पारदर्शी आहे की नाही हे रुग्ण आपल्या अनुभवावरून सांगू शकतात. जो डॉक्टर रुग्ण-संवादी व पारदर्शी असतो तो इतर बाबतीत चांगला असण्याची शक्यता जास्त असते. त्यामुळे या फोरमचे लोकांना आवाहन आहे की तुमच्या अनुभवातील रुग्ण-संवादी व पारदर्शी डॉक्टर्सची नावे, फोन क्र., पत्ते हे mypcdf.org या वेबसाईटवर नोंदवा. म्हणजे इतर रुग्ण या डॉक्टर्सचा अनुभव घ्यायचे ठरवू शकतील.

एखादा डॉक्टर रुग्ण-संवादी व पारदर्शी आहे की नाही हे ठरवण्यासाठी या वेबसाईटवर काही प्रश्न दिले आहेत – डॉक्टरबाबतचा एकंदर अनुभव कितपत समाधानकारक होता: डॉक्टरांनी पुरेसा वेळ दिला का; आजार व त्यावरील उपचार याबाबत पुरेशी माहिती दिली का; प्रश्नांना नीट उत्तरे दिली का? विशिष्ट दुकानातून औषध खरेदी करायचा आग्रह धरला का; फी बद्दल पारदर्शकता होती का; – –- असे हे प्रश्न. त्यांची उत्तरे देण्यासाठी पाच उपलब्ध पर्यायांपैकी एकावर 'टिकमार्क' करायचे आहे. (इस्पितळात दाखल झालेल्या किंवा एखादी प्रोसिजर झालेल्या रुग्णासाठी आणखी काही प्रश्न आहेत.) या उत्तरांवरून हे संकेत-स्थळ आपोआप एक स्कोर तयार करेल व त्या आधारे 'रुग्णसंवादी', पारदर्शी डॉक्टर्सची यादी बनेल. (रुग्णांची नावे अर्थातच जाहीर होणार नाहीत.) जितके जास्त रुग्ण अनुभव नोंदवतील तेव्हढी ही यादी व्यक्ती-निरपेक्ष होईल व वाढत जाईल. अर्थात फक्त या यादीतील डॉक्टर्स तेव्हढे 'चांगले' आहेत असा या फोरमचा दावा नाही.

तज्ञ डॉक्टर शोधण्यासाठी काही धंदेवाईक संकेत-स्थळेही आहेत. 'पुणे सिटीझन डॉक्टर फोरम' मागे मात्र कोणताही व्यावसायिक हितसंबंध नाही. पुण्यातील काही सजग नागरिक, डॉक्टर्स यांनी मिळून स्थापन केलेल्या या फोरमची धर्मादाय संस्था म्हणून नोंद केली जात आहे. त्याच्या सल्लागार मंडळात आहेत –स्त्रीरोगतज्ञ – डॉ संजय गुप्ते, डॉ प्रतिभा कुलकर्णी; त्वचारोगतज्ञ – डॉ विनय कुलकर्णी; बालरोगतज्ञ डॉ जयंत नवरंगे; सजग नागरिक मंचाचे विवेक वेलणकर, पत्रकार व संपादक यमाजी मालकर, कायदेतज्ज्ञ अ‍ॅड. असीम सरोदे व ग्राहक पेठेचे सूर्यकांत पाठक.

**सर्वांना दर्जेदार आरोग्यसेवा**

डॉक्टर्सची अशी यादी बनवणे एव्हढेच या फोरमचे उद्दिष्ट नाही. रुग्ण-संवादी, संवेदनशील डॉक्टर्स व समंजस नागरिक या दोघांची आज कोंडी झाली आहे. ती फोडण्यासाठी त्यांनी एकत्र येऊन एकमेकांना साथ द्यायची

असेही या फोरमचे एक उद्दिष्ट आहे. ही कोंडी फुटायची असेल तर एकूणच खाजगी वैद्यकीय व्यवसाय शास्त्रीय, नैतिक पायावर चालण्याच्या दिशेने जायला हवे. साठी सरकारला काही धोरणात्मक बदल करावे लागतील. त्यासाठी आवश्यक असलेले एक पाउल म्हणजे कोणत्या आजारावर कोणते उपचार कसे व केव्हा करायचे याबाबत तेथील डॉक्टर्सवर 'प्रमाणित शास्त्रीय उपचार मार्गदर्शिका' (Standard Treatment Guidelines) वापरण्याचे जसे बंधन आहे तसे बंधन भारतातील डॉक्टर्सवरही घालायला हवे. (या 'प्रमाणित मार्गदर्शिका' अर्थातच भारतातील परिस्थितीनुसार बनवल्या पाहिजेत.) या मागणीला या यादीतील डॉक्टर्सनी पाठिंबा द्यावा अशी विनंती त्यांना केली जाईल. युरोपातील अनेक देश तसेच कॅनडा, ऑस्ट्रेलिया, जपान, थायलंड इ. देशात 'युनिवर्सल हेल्थ केअर' असे धोरण असल्यामुळे खिशात पैसा असो वा नसो सर्व नागरिकांना गरजेप्रमाणे दर्जेदार उपचार मिळतात. कोणी सरकारमान्य खाजगी डॉक्टरकडे गेले की त्याचे बिल सरकार भरते. मात्र त्यासाठी 'प्रमाणित मार्गदर्शिका' वापरून डॉक्टर्सनी उपचार केले पाहिजेत व "प्रमाणित उपचारांना प्रमाणित दराने शुल्क" या तत्वानुसार बिले बनवली पाहिजेत असे बंधन डॉक्टर्सवर असते. या पद्धतीमुळे डॉक्टर-रुग्ण नात्यात व्यापारी गणिते येत नाहीत व या व्यापारी हिशोबांमुळे डॉक्टर-रुग्ण संबंधात येणारे ताण टळतात. हे लक्षात घेता खाजगी वैद्यकीय सेवेबद्दल असे धोरण भारताने राबवावे, तसेच सार्वजनिक आरोग्य सेवेत सुधारणा करून ती मोठ्या प्रमाणात वाढवावी; खाजगी वैद्यकीय महाविद्यालयातील फी सरकारी महाविद्यालया इतकीच ठेवावी; औषध व व इतर वैद्यकीय क्षेत्रातील खाजगी कंपन्यांवर नियंत्रण आणावे इ. मुद्दे मांडणारे 'अलायन्स ऑफ डॉक्टर्स फोर एथिकल हेल्थ केअर' असे डॉक्टर्सचे व्यासपीठ भारतात उभे राहिले आहे. त्यात सामील व्हावे अशी विनंतीही या यादीतील डॉक्टर्सना करण्यात येईल. तसेच फोरमतर्फे पुण्यात अशा मुद्द्यांवर चर्चा घडवून आणण्यात येईल. एकूणच सर्व जनतेला दर्जेदार, संवेदनशील आरोग्य-सेवा मिळण्यासाठीचे 'युनिवर्सल हेल्थ केअर' असे धोरण सरकारने घ्यायला हवे. यासाठी सामाजिक दबाव निर्माण करावा असाही हा फोरम स्थापण्यामागचा हेतू आहे.

'युनिवर्सल हेल्थ केअर' या लांब पल्ल्याच्या उद्दिष्टाकडे वाटचाल सुरु करण्यासाठी समाजमन घडवण्यासाठी या फोरम तर्फे खालील गोष्टी केल्या जातील - 'युनिवर्सल हेल्थ केअर' वर तसेच डॉक्टर-रुग्ण संबंधाच्या दृष्टीने महत्वाच्या मुद्द्यांवर चर्चा घडवली जाईल व त्याबाबतचे प्रबोधनात्मक साहित्य medimitra.org वर उपलब्ध केले जाईल. तसेच काही प्रमुख आजार व त्यावरील उपचार याबाबत रुग्णांसाठी प्रमाणित माहितीही या संकेत-स्थळावर मराठी, इंग्रजी, हिंदीत उपलब्ध केली जाईल. उदाहरणार्थ - मधुमेह, उच्च-रक्तदाब, हृदयविकार, निरनिराळे कर्करोग असे आजार किंवा हर्निया, मूळव्याध, अपेन्डिसायटीस असे शस्त्रक्रियेची गरज असणारे प्रश्न अशा निरनिराळ्या आजारांबद्दल रुग्णांना नेहमी पडणारे प्रश्न व त्यांना तज्ञांनी दिलेली प्रमाणित उत्तरे अशा प्रकारची प्रमाणित माहिती या संकेत-स्थळावर उपलब्ध केली जाईल.

या नव्या उपक्रमाला व्यापक पाठिंबा व सहभाग मिळाला तरच तो यशस्वी होईल. त्यासाठी आजच पहिले पाउल टाका - mypcdf.org या वेबसाईटला भेट द्या !